दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३२२ वा | रविवार दि. १७ सप्टेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

### आंतरराष्ट्रीय गणेश महोत्सवाचे आयोजन : गिरिश महाजन



**मुंबई ।** राज्यात यंदाच्या वर्षी आंतरराष्ट्रीय गणेश महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. पर्यटनाला चालना देत पारंपारिक कला आणि संस्कृतीची ओळख विदेशातील पर्यटकांना करुन देण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याचं शासनाकडून सांगितलं जात आहे. १८ ते २८ सप्टेंबर या कालावधीमध्ये मुंबई, पुणे, पालघर आणि रत्नागिरी येथे या महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटन संचालनालयाद्वारे या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

## न्यूज कॉलम

### गांजा वाहतूक प्रकरणी सुरतच्या दोघांना बेड्या

**धुळे ।** चोरट्या मार्गाने विक्रीसाठी गांजा नेणाऱ्या सुरतच्या संशयित दोघा तरुणांना दोंडाईचा पोलिसांनी अटक केली. संशयितांकडून ४७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई गुरुवारी रात्री साडेअकराच्या सुमारास झाली. जाकिर शेख शकील शेख (वय २५) व अबरार खान अयुबखान पठाण (२४, रा. उमरपाडा, रिंग रोड, सुरत) अशी त्यांची नावे आहेत. दोंडाईचा शहरातील दोंडाईचा-नंदुरबार मार्गावर दोघे संशयीतरीत्या आढळले. त्यांची पोलिसांनी झडती घेतली. संशयितांच्या बॅगेत गांजा आढळला. त्यांना ताब्यात घेत २४ हजार ३०० किमतीचा गांजा, २० हजारांचा मोबाईल अडीच हजारांची रोकड असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

### सर्जा-राजाला अंघोळ घालताना एकाचा मृत्यू

**धुळे ।** पोळ्यानिमित्त सर्जा-राजाची अंघोळ घालताना पाय घसरून पाण्यात पडल्याने तरुणाचा मृत्यू झाला. लोणखेडी (ता. धुळे) येथील अमोल प्रताप पाटील हा तरुण पोळ्यानिमित्त साठवण बंधाऱ्या किनारी बैलाची अंघोळ घालत होता. यादरम्यान पाय घसरल्याने तो पाण्यात पडला.

# कृषिमंत्र्यांच्या जिल्ह्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या हे दुर्दैवी

### आदित्य ठाकरे यांची सरकारवर टीका

**नाशिक । प्रतिनिधी**

मराठावाड्यातील छत्रपती संभाजीनगर येथे आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडत आहे. या बैठकीसाठी संपूर्ण मंत्रिमंडळ छत्रपती संभाजीनगरमध्ये दाखल झाले आहे. यावेळी ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी सरकावर जोरदार टीका केली.

आदित्य ठाकरे म्हणाले की, मागच्या वर्षी ओला दुष्काळ होता. यावर्षी कोरडा दुष्काळ आहे. शेतकरी हतबल झालेले आहेत. सरकारने काहीही मदत दिलेली नाही. शेतकऱ्यांना कर्ज भरण्यासाठी नोटिसा आल्या आहेत. मागच्या वर्षीच्या घोषणेचेही पैसे आले नसल्याचे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

नाशिक जिल्ह्यात यंदा पाऊस खूपच कमी प्रमाणात झाल्याने जुलैपासूनच दुष्काळी स्थिती निर्माण झाली आहे. त्यानंतर थेट सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात पावसाने हजेरी लावली. मात्र दोन दिवस पाऊस झाला. त्यामुळे सद्यस्थितीत खरीप पिके वाया जाण्याची भीती असून अजूनही शेतकऱ्यांना जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे. निम्मा सप्टेंबरही संपला मात्र अजूनही पावसाने फारशी आभाळमाया केली नसल्याने अनेक भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई देखील निर्माण झाल्याचे चित्र आहे. याच पार्श्वभूमीवर आज आदित्य ठाकरे नाशिक जिल्ह्यात दौरा सुरू केला आहे.राज्याच्या दुष्काळी दौऱ्यावर छत्रपती संभाजी नगरमध्ये त्यांनी दुष्काळग्रस्त भागाची पाहणी केली. त्यानंतर ते नाशिकच्या ग्रामीण भागात दुष्काळी पाहणी दौरा करण्याकरता पोहोचले. नाशिकच्या परिसरातील शेतकऱ्यांची त्यांनी संवाद साधला त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. आदित्य ठाकरे यावेळी म्हणाले की, नाशिक जिल्ह्यात अद्यापही चांगल्या पावसाची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणची पिके पावसाअभावी जळून गेली आहे, उरले सुरले पिके जगविण्यासाठी शेतकरी धडपड करत आहेत. पाऊस नसल्याने शेतकऱ्यांवर मोठं संकट कोसळल आहे. आदित्य ठाकरे यांनी दौऱ्याला सुरवात केली. यात सुरवातीला निफाड तालुक्यातील भेंडाळी येथील शेतकऱ्यांशी संवाद साधला. येथील शेतकऱ्यांशी संवाद साधून पावसाअभावी शेतीचे कसे नुकसान होत आहे, याबाबत शेतकऱ्यांची चर्चा केली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी आदित्य ठाकरे यांना सरकारकडून मदत मिळण्यासाठी विनंती केली. यावेळी आदित्य ठाकरे म्हणाले की, 'आपण पहातोय की पाऊस नसल्याने शेती पिकांचे मोठे नुकसान होत आहे. दुसरीकडे राज्याचे मुख्यमंत्री बोलून मोकळं व्हायचं अशी भूमिका घेत आहेत, पण जनतेचे पण कान उघडे आहेत, मग शेजारच्या लोकांनी माईक चालु असल्याचे सांगत, जास्त बोलू नका' असा सल्ला दिला. ही जी वृत्ती आहे ना, की आपल्याला जो मोठे करतो, आपल्यासोबत राहून सगळं काही देतो, त्याच्याच पाठीत खंजीर खुपसून निघून जायचं, ही वृत्ती जनतेने ठेचून काढली पाहिजे, पण घाबरू नका, आम्ही तुमच्यासोबत आहोत असही ठाकरे यावेळी म्हणाले.



#### आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी ...

**राज्याच्या दुष्काळी दौऱ्यावर छत्रपती संभाजीनगरमध्ये त्यांनी काल दुष्काळग्रस्त भागाची पाहणी केली. त्यानंतर ते नाशिकच्या ग्रामीण भागात दुष्काळी पाहणी दौरा करण्याकरता पोहोचले. नाशिकच्या परिसरातील शेतकऱ्यांची त्यांनी संवाद साधला त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. सकाळी ठाकरे यांनी निफाड तालुक्यातील भेंडाळी येथील शेतकऱ्यांशी संवाद साधत पिकांची पाहणी केली. त्यानंतर सिन्नर तालुक्यातील काही गावांना भेटी दिल्या.**

#### महिला अत्याचारावर कुणी बोलणार नाही

**आदित्य ठाकरे म्हणाले की, मंत्रिमंडळाच्या बैठकीवरून काहीही अपेक्षा नाही. याउलट मंत्रिपदांसाठी भांडणे सुरू आहेत. मुळात शेतकरी, महिला अत्याचार आणि उद्योग दुसऱ्या राज्यात जाण्यावर कोणीही बोलण्यास तयार नाही. आजही ५० हजार कोटींच्या घोषणा होतील. मात्र घोषणा या घोषणाच राहतात.**

#### सरकार संवेदनशील आहे की नाही?

**आदित्य ठाकरे म्हणाले की, कृषिमंत्र्यांच्या जिल्ह्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या आहे. गेल्या वर्षी सततच्या पावसामुळे ओला दुष्काळ होता. त्यावेळी आम्ही सातत्याने ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली होती. आता देखील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सरकार संवेदनशील आहे की, नाही असा प्रश्न पडतो.**

## शिरपूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का; कार्यकर्त्यांचा ठाकरे गटात प्रवेश



**धुळे । प्रतिनिधी**

शिरपूर तालुक्यातील युवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्षांसह माजी पदाधिकारी व काही कार्यकर्तेनी काल शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला. उध्दव ठाकरे यांच्या उपस्थित मुंबई येथे हा पक्ष प्रवेश संपन्न झाला.

शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते मुंबई येथील मातोश्री येथे शिवबंधन बांधून शिरपूर तालुक्यातील राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष युवराज पाटील,राष्ट्रवादी कांग्रेस पार्टीचे माजी सरचिटणीस नितीन निकम, राष्ट्रवादीचे शरद पाटील यांनी शिवसेना (उबाठा) पक्षात जाहीर प्रवेश झाला.

याप्रसंगी माजी मंत्री व शिवसेना नेते सुभाष देसाई, शिवसेना नेते अरविंद सावंत, धुळे जिल्हा संपर्कप्रमुख मा. अशोक धात्रक, नंदुरबार जिल्हा संपर्कप्रमुख शरद पाटील, उत्तर महाराष्ट्र महिला आघाडी संपर्क प्रमुख शुभांगी पाटील, सह संपर्कप्रमुख हिलाल अण्णा माळी, जिल्हाप्रमुख हेमंत साळुंखे, जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, माजी महापौर भगवान करंकाळ, शिरपूर विधानसभा संपर्कप्रमुख रवींद्र धनावडे, उपजिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत, युवती सेना विस्तारक प्रियांका जोशी व जिल्ह्यातील शिवसैनिक यांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा संपन्न झाला.

### ओबीसींच्या आरक्षणात कुणालाही वाटेकरी होऊ देणार नाही : फडणवीस

**नागपूर ।** समाजाला आरक्षण द्यायचं असेल तर ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नका, अशी आक्रमक भूमिका ओबीसी समाजाने घेतली आहे. त्यासाठी विविध आंदोलनंही करण्यात येत आहेत. आज छत्रपती संभाजी नगरमध्येही आंदोलन करण्यात आले तसेच नागपूरमध्येही आंदोलन करण्यात येत आहे. दरम्यान, याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचे विधान केले आहे. ते म्हणाले की, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही, असे विधान त्यांनी केले. त्यामुळे ओबीसी बांधवांना आमची विनंती आहे. त्यांनी जे काही आंदोलन सुरु केलेले आहे ते मागे घ्यावं, कुठल्याही प्रकारचे आंदोलन त्यांनी करु नये असे देखील त्यांनी सांगितले.

## धुळे शहरात दिवसभर सूर्य दर्शन नाही



**धुळे । प्रतिनिधी**

हतनुर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस झाल्याने धरणाच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे काल सकाळी ६ वाजता या धरणाचे ३२ दरवाजे उघडण्यात आले असून तब्बल १ लाख ७९ हजार ८९५ क्युसेक विसर्ग तापी नदीपात्रात सोडण्यात आला आहे. त्यामुळे धुळे जिल्ह्यातील तापी काठच्या गावांना 'अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, धुळे शहर परिसरात रात्रीपासून रिपरिप पाऊस सुरु असून आणखी दोन दिवस पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पावसामुळे किमान तापमान २० अंशावर आल्याने वातावरणात गारवा जाणवत आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाचे पुनरागमन झाल्याने जळगाव जिल्ह्यातील हतनुर धरणाची जलपातळी वाढली आहे. त्यामुळे आज सकाळी ६ वाजता या धरणाचे ४ दरवाजे पूर्ण क्षमतेने तर ३२ दरवाजे १.५० मी. उंचीने उघडण्यात आले आहेत. त्याद्वारे तब्बल १ लाख ७९ हजार ८९५ क्यूसेक विसर्ग तापी नदी पात्रात सोडण्यात आलेला आहे. शिवाय पुढील काही तासात २ ते अडीच लाख क्युसेकपर्यंत विसर्ग केला जाणार आहे. त्यामुळे तापी नदीला पूर पाण्याचा येवा लक्षात घेता सुलवाडे बॅरेज मध्यम प्रकल्पातून पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी दुपारी २ वाजेपर्यंत १ लाख ते १ लाख ५० हजार क्यूसेक्स विसर्ग सोडण्यात येणार आहे. त्यामुळे तापी नदीच्या जलपातळीत वाढ होवून पूर येण्याची शक्यता आहे.

तरी तापी काठावरच्या गावातील नागरिकांनी नदीपात्रामध्ये आपली गुरेढोरे सोडू नये अथवा नदी पात्रामध्ये जाऊ नये. नदीमधील पाण्याचे पंप सुरक्षितस्थळी हलविण्यात यावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. याबाबत शिंदखेडा व शिरपूर तहसीलदार यांनाही सूचना देण्यात आल्या आहेत.

## उद्धव ठाकरेंनी मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेचा मुद्दा पाडला

### निधीच मंजूर केला नाही, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची सडकून टीका

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांच्या सरकारने मराठवाडा वॉटरग्रीडचा मुद्दा पाडला. त्यांना मराठवाड्याशी काही देणेघेणे नाही, अशी घणाघाती टीका आज राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. छत्रपती संभाजीनगरमध्ये आज मंत्रिमंडळाची बैठक पार पाडली. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. पत्रकार परिषदेत मराठवाड्यासाठी यापूर्वी सरकारने केलेल्या घोषणांचे काय झाले? याबाबत देवेंद्र फडणवीसांनी माहिती दिली. यावेळी त्यांनी ठाकरे सरकार, उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्ला चढवला.


पत्रकार परिषदेत देवेंद्र फडणवीस म्हणाले, तुम्ही अडीच वर्षे माशा मारत होतात का? मराठवाडा वॉटरग्रीडचा मुद्दा पाडण्याचे काम ज्या सरकारने केले आता तेच लोक आम्हाला जाब विचारत आहेत. जे आम्ही तुम्हाला दिले होते त्याचाही मुद्दा पाडला. त्यांना मराठवाड्याशी घेणेदेणे नाही. आता मराठवाड्याच्या हिताची बैठक होत आहे. ही बैठक कशी हाणून पाडायची हा त्यांचा कावा आहे. हे कावेबाज लोक आहेत.मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेंतर्गत मराठवाड्यातील ११ धरणे एकमेकांशी लूप पद्धतीने जोडली जाणार आहेत. त्यासाठी १३३० किलोमीटर पाइपलाईन टाकली जाईल. यात जायकवाडी (छत्रपती संभाजीनगर), येलदरी (परभणी), सिद्धेश्वर (हिंगोली), माजलगाव (बीड), मांजरा (बीड), ऊर्ध्व पैनगंगा (यवतमाळ), निम्न तेरणा (उस्मानाबाद), निम्न मण्यार (नांदेड), विष्णूपुरी (नांदेड), निम्न दुधना (परभणी) व सीना कोळेगाव (धाराशिव) या धरणांचा समावेश आहे.



#### तुम्ही माशा मारत होता का?

**पत्रकार परिषदेत देवेंद्र फडणवीस म्हणाले, तुम्ही अडीच वर्षे माशा मारत होतात का? मराठवाडा वॉटरग्रीडचा मुद्दा पाडण्याचे काम ज्या सरकारने केले आता तेच लोक आम्हाला जाब विचारत आहेत. जे आम्ही तुम्हाला दिले होते त्याचाही मुद्दा पाडला. त्यांना मराठवाड्याशी घेणेदेणे नाही. आता मराठवाड्याच्या हिताची बैठक होत आहे. ही बैठक कशी हाणून पाडायची हा त्यांचा कावा आहे. हे कावेबाज लोक आहेत.**

## गौण खनिजाची बेकायदेशीर वाहतूक; दोन वाहने जप्त



**धुळे । प्रतिनिधी**

अपर तहसिल कार्यालयाचे पथक गस्तीवर असताना त्यांना अवधान व मोहाडी परिसरात गौण खनिजाची बेकायदेशिर वाहतूक करणारा ट्रक व डम्पर निदर्शनास आले. चालकांकडे चौकशी केली असता त्यांचेकडे रॉयल्टीचे कुठलेही कागदपत्र आढळले नाही. परिणामी, दोन्ही वाहने तहसिल कार्यालयाच्या आवारात जमा करण्यात आले.

अवैध गौण खनिजाची बेकायदेशिररित्याहोणारी तस्करी उघडकीस आणण्याकरीता आज धुळे अपर तहसिल कार्यालयातील अपर तहसिलदार विनोद पाटील, मंडळ अधिकारी पंडीत दावळे, सागर नेमाणे, कमलेश बावीस्कर, महसूल सहय्यक नाना गवळी हे पथक गस्तीवर असताना त्यांना अवधान शिवारात ओव्हरलोड वाळुने भरलेला ट्रक दिसून आला. चालकाकडे चौकशी केली असता त्याचेकडे रॉयल्टी भरल्याची कोणतीही पावती आढळून आली नाही. परिणामी, चालकास डम्पर तहसिल कार्यालयाकडे वळविण्याच्या सुचना करण्यात आल्या. त्यानुसार डम्पर धुळे तहसिल कार्यालय कार्यालयात आणण्यात आला. यावेळी पथकाला मोहाडी परिसरातही मुरुमने भरलेला डम्पर निदर्शनास आला. पथकाने डम्पर चालकाकडे रॉयल्टीबाबत कागदपत्रांची विचारणा केली. मात्र, चालकाकडे रॉयल्टी भरल्याची पावती आढळून न आल्याने हा डम्पर देखील तहसिल कार्यालयात जमा करण्यात आला. या कारवाईत एम.एच.२६/ एच ७३१४ क्रमांकाच्या डम्परसह एक अन्य डम्पर गौण खनिजासह ताब्यात घेण्यात आला.

## अंबिका नगर परिसरातील कार्यकर्त्यांचा एम.आय.एम.पक्षात प्रवेश

**धुळे । प्रतिनिधी**

अंबिका नगर येथील युवकांनी व नागरिकांनी आ.फारुख शाह यांचा धुळे शहरातील विकास कामांचे धडाका बघून एमआयएम पक्षात मोठ्या संख्येने प्रवेश केला.

धुळे शहरातील अंबिका नगर हे सुमारे ४० वर्षापासूनची लोकवस्ती असून तेथे आज पर्यंत कोणत्याच आमदारांनी काम केलेले नव्हते हा भाग पूर्णपणे विकास कामापासून वंचित होता. या भागातील नागरिकांनी आ.फारुख शाह यांना वेळोवेळी या भागातील रस्ते गटारी लाईट पाण्याची पाईपलाईन या संदर्भात निवेदन दिलेले असता. त्या अनुषंगाने आ.फारुख शाह यांनी चार वर्षात सुमारे दहा ते पंधरा करोड रुपये चे कामे या भागात केलेले आहे. या कामाच्या धडाका पाहून या भागातील नागरिकांनी एम आय एम पक्षात प्रवेश केला व पक्षाच्या कामासाठी यापुढे काम करणार असल्याची ग्वाही दिली. अंबिका नगर मध्ये संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे वेळेस आ.फारुख शाह यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की धुळे शहरातील नागरिकांच्या विकास हाच माझा ध्यास राहिलेला आहे व पुढे सुद्धा राहणार आहे. धुळे शहरातील नागरिकांसाठी रेशन कार्ड ची समस्या असो अन्नधान्याची समस्या असो संजय गांधी निराधार च्या महिलांच्या समस्या असो व विकास काम संदर्भात मी आज पर्यंत प्रामाणिकपणे काम केलेले आहे व यापुढे सुद्धा करणार. निवडणुकीच्या वेळेस कित्येक लोक येतील व खोटी आश्वासन देऊन जातील परंतु मी जे सांगितले त्याच्यापेक्षा दुप्पटीने शहराच्या विकासासाठी काम केलेले आहे यानंतर आ.फारुख शाह यांच्या हस्ते अंबिका नगरात एम आय एम पक्षाच्या बोर्डाचे उद्घाटन आ.फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी या भागातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ.फारुख शाह यांचा आसिफ अन्सारी,आरिफ सैय्यद,रज्जाक पठाण,वसिम पठाण यांनी नागरी सत्कार केला. यावेळी मंचावर मौलाना समसुल आरफिन,सलीम सेठ शाह,नगरसेवक गनी डॉलर,नगरसेवक आमिर पठाण, मौलाना शकील, प्यारेलाल पिंजारी,इकबाल शाह, सुफी हाजी, छोटू मच्छी वाले, रफिक पठाण,सादिक शाह, रिझवान अन्सारी, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आसिफ शाह,परवेज शाह,शाहिद शाह,रफिक काझी,जुबेर शेख, मोहम्मद शाहिद ,बाबुभाई मोबीन अहमद, मुक्तार तांबोळी ,शफिक सय्यद ,अब्दुल शकूर शाह, मोहम्मद कुमार सरदार ,शराफत पठाण,सादिक खान,माजीद मनियार,सलमान खान,शाहरुख खान,आमिर खान,सरफराज अन्सारी, इमाम रगारी,जमाल रंगारी,रौफ खान,अजीज शाह,समीर खान, सउद आलम, शहजाद मन्सुरी,मोईन शेख यांनी प्रयत्न केले.



## नाशिक जिल्ह्यात पावसाचा ऑरेंज अलर्ट

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शहर व जिल्ह्यामध्ये मागील आठवड्याप्रमाणे मुसळधार पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. रविवार रोजी कुलाबा येथील वेधशाळेने नाशिक जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. यामुळे जिल्ह्यात मुसळधार पाऊस होऊ शकतो, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. नाशिक जिल्ह्याला मागील महिन्यापासून मुसळधार पावसाची प्रतीक्षा कायम होती. मागील आठवड्यात झालेल्या दोन दिवसांच्या पावसामुळे शेती पिकांना जीवदान मिळाले होते, मात्र पुन्हा पावसाने दडी मारल्याने परीस्थिती जैसे थे झाली आहे. धरणांची खालावलेली पाणी पातळी दोन दिवसांच्या पावसाने वाढली, मात्र पिकांना अजूनही जोरदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. नाशिक जिल्ह्यातील धरणामध्ये ९० टक्के इतका पाणीसाठा असून २३ २० धरणांची पातळी नव्वद टक्क्यांवर पोहचली आहे. यात पाच धरणे शंभर टक्के भरली आहेत. आज आणि उद्या पावसाचा ऑरेंज अलर्ट असून जिल्ह्यात पावसाची प्रतीक्षा असल्याने या दोन दिवस पाऊस पडावा अशी प्रार्थना शेतकरी करत आहेत. हवामान खात्याने या शुक्रवारी नाशिक जिल्ह्याला यलो अलर्ट' अर्थातच मध्यम पावसाचा इशारा दर्शविला होता. शहरात हलक्या सरीचा वर्षाव काही भागात झाला. पावसाचे वातावरण तयार झालं होतं अन ढग दाटून आले.

## लुटमार थांबणार कधी?

गणेशोत्सव आला की मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई-विरार अशा महामुंबईत राहणाऱ्या कोकणी माणसाला किंबहुना प्रत्येक चाकरमान्याला वेध लागतात ते कोकणातील आपल्या गावाचे. तेथे जाऊन गणपती बाप्पांची यथासांग पूजा-अर्चा करून जमल्यास सत्यनारायणाची पूजा, भजनांचे कार्यक्रम यांचा मेळ घालून एक वेगळे आत्मीक समाधान पदरात पाडून घेण्यासाठी त्याची, त्याच्या कुटुंबीयांची अहमहमिका सुरू असते. त्यातून त्याला कोकणची प्रचंड ओढ लागते. त्यासाठी तो रेल्वे, एसटी, खासगी लक्झरी बस किंवा अन्य वाहनांच्या माध्यमातून गावी जाण्याचा प्लान आखतो. त्याची ही योजना वाटते, तितकी सहजसोपी कधीच नसते व नाही. त्याला गावी जाण्याची (कोणत्याही वाहनाची) तिकिटे मिळविण्यासाठी जंगजंग पछाडावे लागते. ज्यांनी आधीच कार्यालवीन सुट्टीचे नियोजन करून चार महिन्यांअगोदर रेल्वेचे रिझर्व्हेशन केले असेल ते मात्र कामलीचे नशीबवान. पण अशांची संख्या ही अगदीच नगण्य म्हणावी लागेल. कारण कोकणात जाणाऱ्या सर्वच गाड्यांची तिकिटे ही रिझर्व्हेशनची प्रक्रिया सुरू होताच काही मिनिटांतच गाड्या फुल्ल होऊन जातात व निराशा पदरी पडते. त्यानंतर लोकांची अन्य मार्गाने तिकिटे पदरात पाडून घेण्यासाठी धावपळ सुरू होते. काहीजण आपल्याला हव्या त्या दिवसाची आणि हवी त्या वाहनांची तिकिटे मिळविण्यात यशस्वी ठरतात आणि उरलेल्या जीवांची सुरू होते न संपणारी परवड.

मात्र गणपतीसाठी कोकणात जाणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून कोकणातील लोकप्रिय भाजप आमदार नितेश राणे यांच्यातर्फे 'मोदी एक्स्प्रेस' सोडली जाणार आहे. विशेष म्हणजे हा प्रवास मोफत असून त्यासाठी आरक्षण करावे लागणार आहे. कोकणचा स्वाभिमान नारायण राणे यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोकणाला आशीर्वाद दिला असल्यामुळे त्यांचे आभार मानण्यासाठी गणेश चतुर्थीसाठी नितेश राणेंतर्फे मोदी एक्स्प्रेस सोडण्यात येत आहे. ही ट्रेन १८०० नागरिकांसाठी सोडण्यात येणार असून, दादरहून कणकवली, वैभववाडी आणि सावंतवाडीपर्यंत धावणार आहे. तसेच प्रवासात एक वेळचे जेवणदेखील दिले जाणार आहे. हा झाला एक स्तुत्य उपक्रम.

कोकणात मोठ्या प्रमाणावर गणेशोत्सव साजरा केला जात असल्याने त्यानिमित्त एसटीने जादा बसेस सोडल्या आहेत. त्याशिवाय, मध्य रेल्वे आणि कोकण रेल्वेनेही अतिरिक्त एक्स्प्रेस चालवल्या आहेत. कोकणावासीयांकडून याला चांगला प्रतिसादही मिळाला आहे. मात्र, एसटी आणि रेल्वेत आरक्षण न मिळाल्याने अनेकजण नाईलाजापोटी खासगी वाहतुकीचा पर्याय अवलंबतात. अशा नाडलेल्या प्रवाशांची असलेली गरज पाहता खासगी बसचालकांकडून मोठ्या प्रमाणावर तिकीट दर वाढविले जातात. विशेष म्हणजे अधिक बस असल्याने आसनेही रिक्त असतात. मात्र सणानिमित्ताने ही दरवाढ करण्यात आली असल्याचे समोर आले आहे.

कोरोना महामारीचा जोर ओसरल्याने आता सर्व काही पूर्वपदावर आल्याने यंदाचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. अनेकांचा गणेशोत्सवासाठी गावाकडे जाण्याचा ओढा असल्याचे दिसून येत आहे. मात्र गणेशोत्सवानिमित्त गावी जाणाऱ्या व पेचात सापडलेल्या या सामान्यजनांची खासगी ट्रॅव्हल चालकांकडून लूट होत असल्याची बाब समोर आली आहे. जादा बस असल्या तरी गणेशोत्सवानिमित्ताने अधिक भाडे वसूल केले जात असल्याचे उघड सत्य आहे. त्यामुळे खासगी ट्रॅव्हल्सच्या तिकीट दर निश्चितीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. यंदाच्या गणेशोत्सवाच्या काळात खासगी ट्रॅव्हल्सवाल्यांनी आपले तिकीट दर दुप्पट केले आहेत. त्यानुसार राजापूरकडे जाण्यासाठीचे दर हे नॉन-एसीसाठी १३०० रुपये आणि एसी सीटिंगसाठी सुमारे २१०० रुपये दर आहेत. प्रत्यक्षात खासगी ट्रॅव्हल्सकडे हे दर असले तरी ऑनलाइन बुकिंग ॲप्सवरही हे दर अधिक असल्याचे म्हटले जाते. फक्त गणपतीचा सण आहे म्हणून दर अधिक असतात व गणेशोत्सवाचा सण संपल्यानंतर दर पुन्हा सामान्य केले जातात, ही नित्याचीच बाब आहे. गणेशोत्सवानंतर कोकणात होळीचा मोठा सण असतो. त्यानंतर मे महिन्याची उन्हाळी सुट्टी, दिवळीचे दिवस, नाताळची सुट्टी असो, अशा महत्त्वाच्या सुट्टीच्या दिवसांमध्येही खासगी ट्रॅव्हल्सवाल्यांकडून दर वाढविले जातात आणि सामान्य प्रवाशांची लूट केली जाते. गणपती सणाच्या पार्श्वभूमीवर मुंबईतून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. याच काळात खासगी वाहतूक करणाऱ्या बसचालकांकडून प्रवाशांकडून अवाच्या सव्वा पैसे आकारले जातात.

## महिलांसाठी आधारस्तंभ: नवचेतना स्वयंरोजगार सहाय्य समिती!



समाजातील दारिद्र्य, गरिबी दूर करायची असेल तर कौशल्यशिक्षण आणि स्वयंरोजगाराशिवाय पर्याय नाही. त्यासाठी नवचेतना स्वयंरोजगार सहाय्य समिती नाशिक जिल्ह्यात काम करीत आहे. या संस्थेच्या वतीने जिल्हाभर प्रशिक्षणाचे विविध वर्ग सुरू आहेत. सुरगाणा तालुक्यातील भिंतघर परिसरातील महिलांसाठी गोधडी शिवण्याच्या प्रकल्पासाठी महिलांशी चर्चा करीत असताना त्यांनी शिवणकाम वर्ग घेण्याविषयी सुचवले. तिथून महिलांसाठी मोफत शिवण क्लास वर्ग सुरू झाले. यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवक, दानशूर व्यक्ती व संस्था यांचे सहाय्य लाभले. या सर्वांच्या मदतीतून शिवणकामासाठी आवश्यक शिवण क्लास प्रशिक्षकाची फी, शिवणकामाचा हॉल, शिवणकामाकरता आवश्यक कपडे या बाबींची पूर्तता शक्य झाली.

सुरगाणा तालुक्यातील

भिंतघर नाशिक पासून शंभर किलोमीटरवर आहे .अतिशय दुर्गम व शंभर टक्के आदिवासी वस्तीचा भाग आहे. तेथील महिलांनी मागणी केल्याप्रमाणे शिवणकामाचा वर्ग घ्यायचा ठरला. परंतु तेथे प्रशिक्षक उपलब्ध नसल्यामुळे नाशिकच्या जगताप मॅडम यांना विनंती केली. शनिवार, रविवार वर्ग घ्यायचे ठरले. शनिवारी मुक्कामाच्या तयारीने जगताप मॅडम व स्वयंसेवक जोडपे नाशिकहून जायचे व शनिवार- रविवार येथील मुली व महिलांना शिवणकाम शिकवण्यात आले. शिवणकाम वर्ग ८ आठवडे चालला. त्यासाठी देणगीतून चार मशीन जुन्या घेतल्या. काही नवीन मशीनही मिळाल्या. हा प्रशिक्षण वर्ग अतिशय यशस्वी झाला व जवळपास ५० महिला शिवणकाम शिकल्या. निरंतर प्रयत्नातून कुठेही, कोणालाही कौशल्य विकासाचे शिक्षण शक्य आहे. गारे काका आणि त्यांच्या स्वयंसेवक टीमने वर्गासाठी मदत केली.

राजा शिवाजी केंद्र, तिडके कॉलनी येथे वर्ग घेण्यात आला. येथील प्रतिसाद फार मोठा होता. शंभर महिलांनी विनंती केली होती. परंतु हॉल मिळत नव्हता. त्यासाठी राजा शिवाजी केंद्रातील हॉल तीन महिन्यांसाठी भाड्याने घेतला. मशीन मिळवले .जगताप मॅडमने तिथे प्रशिक्षण दिले. तीन महिने वर्ग चालला .येथून जवळ जवळ ७० महिला प्रशिक्षित झाल्या. रोटरी क्लब व विविध संघटनांची यासाठी मदत झाली.

नांदगावला वर्ग घेण्याविषयी विदुला कसबे मॅडमने विनंती केली. नाशिकहून त्यांना मशीन पाठवले. त्यांनी नांदगावातूनच प्रशिक्षिका घेतल्या .या वर्गात तीन महिन्यात जवळपास ५० महिला शिवणकाम शिकल्या. श्री संजय लोंढे यांनी प्रशिक्षणाची फी दिली.

रामदास स्वामी मंदिरासमोर टाकळी नाशिक येथे येथील महिलांसाठी तीन महिन्याचा मोफत शिवण क्लास वर्ग घेतला .देणगीमधून मशीन मिळाले. रोहिणी मॅडमने येथे तीन महिने प्रशिक्षण देवून महिलांना प्रशिक्षित केले .यातून बऱ्याच महिला शिवणकाम शिकल्या.

भारत नगर ५० हजारापेक्षा जास्त वस्तीचा भाग आहे .येथे मी व ऋचा ठाकूर महिलांशी बोलल्यानंतर तेथे प्रशिक्षण सुरू करण्यात आले .येथील सहभाग उत्तम होता. जवळपास ७० महिलांनी सहभाग नोंदवला. तीन महिने प्रशिक्षण चालले. येथे रोहिणी मॅडमने सर्व प्रशिक्षण दिले. विश्वास ज्ञान प्रबोधिनी हा वर्ग स्पॉन्सर केला. अब्दुल सदा यांनी शिवण कामासाठी कपडे दिले.

सिन्नर फाटा नाशिकरोड विभागातील सिन्नर फाटा येथे महिलांना प्रशिक्षणाची मागणी आली. डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या परिसरात प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. महिलांचा प्रतिसाद फारच उत्तम होता. जवळपास ७५ महिलांनी प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण कल्पना मॅडम यांनी दिले.मीना आढाव मॅडम यांनी संपूर्ण जबाबदारी घेतली. श्री राहुल सूर्यवंशी यांनी प्रायोजकत्व स्विकारलं.

आनंदवली

आनंदवल्लीत मुलीचा प्रशिक्षण वर्ग घेण्याविषयी मी व ऋचा ठाकूर सर्वांशी बोललो. त्यातून विश्वास लॉन्स परिसरात उत्तम वर्ग संपन्न झाला .यासाठी शेख मॅडमने प्रशिक्षण दिले. बिल्डर असोसिएशनच्या महिलांनी शिवण क्लास मशीन दिले. विश्वास प्रबोधनी ने मानधन दिले.

देव डोंगरीचा प्रशिक्षण वर्ग श्री गुरुजी रुग्णालयाच्या सेवा संकल्प समितीच्या मदतीने घेण्यात आला. नाशिक येथून रोहिणी मॅडम आठ आठवडे शनिवार रविवार देव डोंगरी येथे गेल्या. प्रशिक्षण उत्तम रित्या संपन्न झाले. यासाठी मनोज खांडेकर यांनी संपूर्ण स्पॉन्सरशिप दिली होती. ८ आठवडे शनिवार रविवार हा वर्ग चालला. प्रशिक्षणातून जवळपास ५० महिला प्रशिक्षित झाल्या.

दरी - राहा फाउंडेशनच्या मदतीने हा कोर्स सुरू झाला आहे. या प्रशिक्षण वर्गात सत्तर महिला समाविष्ट झाल्या आहेत. रोहिणी मॅडम यानी प्रशिक्षण दिले. हा वर्ग शनिवार रविवार असा आठ आठवडे चालला.

खुटवड नगर (नवीन नाशिक) येथे शिवण क्लास वर्ग सुरू झाला आहे .त्यात महिलांचा सहभाग अतिशय उत्तम आहे. हा वर्ग दररोज दोन तास असा तीन महिने चालेल. जगताप मॅडम प्रशिक्षिका आहेत.

मेळूस्के, तालुका दिंडोरी येथे प्रशिक्षण वर्ग सुरू झाला आहे. महिलांचा प्रतिसाद उत्तम आहे. स्थानिक महिलेने प्रशिक्षणाची जबाबदारी घेतली आहे.

जातेगाव, तालुका त्र्यंबकेश्वर येथे प्रशिक्षण वर्ग सुरू झाला आहे. येथील प्रतिसादही उत्तम आहे. स्थानिक महिलेने प्रशिक्षणाची जबाबदारी घेतली आहे. श्री संजय लोंढे यांनी मेळुस्के व जातेगाव येथील वर्ग स्पॉन्सर केले आहेत.

कळासनी येथील आश्रम शाळेतील मुली व गावातील महिला यांच्यासाठी मोफत शिवणकाम वर्ग सुरू झाला आहे. स्थानिक महिलेने प्रशिक्षणाची जबाबदारी घेतली आहे. श्री विनय बिरारी यांनी आपल्या ५० व्या वाढदिवसानिमित्त या वर्गाला स्पॉन्सरशिप दिली आहे.



शब्द संवाद

**प्राचार्य प्रशांत पाटील**
**(नाशिक) मो.९५११८५९९३९**

म्हसरूळ, नाशिक येथे दोन प्रशिक्षण कोर्स २० ऑगस्ट पासून सुरू झाले असून दोन्ही कोर्स मधील उपस्थिती ७५ पेक्षा जास्त आहे.

कनकापूर, तालुका देवळा येथे मोफत शिवण क्लास सुरू झाला असून तेथील बापू शिंदे वर्गाचे समन्वयन करील आहेत.

या सर्व रचनेतून शेकडो महिला मोफत प्रशिक्षित झाल्या आहेत. या सर्व वर्गासाठी वह्या, पेन, ब्लॅक बोर्ड श्री रमेश आय्येर यांनी दिले. कालिका मंदिराचे श्री. केशव पाटील यांनी ब्लाऊज पिस दिले. या मोफत शिवण काम वर्गातून महिलांसाठी गारमेंट फॅक्टरीमध्ये काम किंवा त्या आहेत तिथेच शिवणकामाचे जॉब वर्क देण्याचे कार्य सुरू आहे. कोणत्याही वयोगटातील महिला, पुरुषांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांचा आर्थिक स्तर बदलता येऊ शकतो, हे यातून सिद्ध होते आहे.

प्रशिक्षणासाठी नवचेतना स्वयंरोजगार सहाय्य समितीचे प्राचार्य प्रशांत पाटील(अध्यक्ष), विजय बाविस्कर(समन्वयक) ,कैलास देसले , ऋचा ठाकुर,संजय लोंढे, विनय बिरारी, रवींद्र पाटील, डॉ राजेंद्र कलाल, डॉ राजेंद्र नेहते, डॉ अनिता नेहते,कैलास पाटील, अब्दुल सदा यांच्यासहित सर्व स्वयंसेवकांचे तसेच अनेक व्यक्ती व संस्थांचे सहकार्य लाभत आहे. शिवणकाम वर्गा सोबतच मोबाईल रिपेरिंग, विद्युत उपकरणांची रिपेरिंग, प्लंबिंग, वॉटर प्युरिफायर रिपेरिंग, ए सी रिपेरिंग, लिफ्ट रिपेरिंग, बागकाम यासारख्या विविध कौशल्य विकासाच्या कार्यक्रमातून *नाशिक जिल्ह्यात आतापर्यंत पाच हजार लोकांना कायमस्वरूपी रोजगार प्राप्त झाला आहे. प्रशिक्षणाचे स्वरूप काही काळ प्रशिक्षण, त्यानंतर संबंधित क्षेत्रात हेल्पर किंवा असिस्टंट म्हणून काम, त्यानंतर पाच सहा महिन्यात अतिशय कौशल्य असलेला कारागीर तयार होतो. त्याला पाचशे ते हजार रुपये रोज मिळायला लागतो व त्यातून तो व त्याचे कुटुंब स्वावलंबी होते. सरकारी यंत्रणा तसेच सरकारकडून कोणत्याही प्रकारची मदत न घेता, लोकांनी लोकांसाठी केलेल्या कामांमुळे लोक उभे राहत आहेत. हीच रचना संपूर्ण राज्य तसेच देशभर न्यायचा विचार आहे. त्यातून स्वावलंबी भारत नक्कीच उभा राहील.

## मानव एकात्मतेचे जीवन - संत राजिन्दर सिंह जी महाराज

**आपण एकात्मतेने कसे जगू शकतो या करिता पहिली पायरी म्हणजे आपल्या मनात कोणाबद्दलही द्वेष किंवा पूर्वग्रह नसणे. त्या करिता आपल्याला विविध धर्म, राष्ट्र, जाती, रंग आणि आर्थिक स्तरावरील लोकांबद्दल खरे प्रेम निर्माण करावे लागेल. आपल्यातील पक्षपात, भेदभाव दूर करावा लागेल. असं म्हणतात की आपण अत:करणापासून बोलत असलो, जर कोणाबद्दल तिरस्कार करीत असलो तर तो लपवू शकत नाही. तो आपल्या चेहऱ्यावर झळकतो किंवा बोलण्यातून व्यक्त होतो. आपल्या शब्दांपेक्षा आपल्या कार्य जास्त प्रभावी आहे. त्या उलट, मानवी एकात्मतेत जगण्याची सुरूवात इतरांप्रती वैरभाव न ठेवता आपल्या अंत:करणापासून सुरु होते.**



अशा अनेक विविध क्षेत्रातही आपण मानवी एकात्मतेने जगू शकतो. शिक्षण क्षेत्रात शिक्षक आणि प्रशासक असे कार्यक्रम तयार करू शकतात जिथे मुलांना विविध धर्माच्या लोकांसोबत एकत्र काम करण्याची संधी मिळेल. अर्थशास्त्राच्या क्षेत्रातही आपण लोकांच्या हिताचे निर्णय घेऊ शकतो, भले त्यांची पार्श्वभूमी कोणतीही असो. संवाद आणि माध्यमांमध्ये काम करणारे लोक सकारात्मक मूल्यांचा प्रसार करून इतरांना प्रेरणा देऊ शकतात. ज्यामुळे पक्षपात, भेदभाव आणि विषमता दूर होऊ शकते, जे लोक राजकारणात आहेत ते अशा धोरणांना चालना देऊ शकतात, जेणेकरून समाजात एकता, समता आणि शांतता प्रस्थापित होईल, मानवी एकात्मतेने जगण्याच्या संधींची कमतरता नाही.

धर्माचे क्षेत्र हे आणखी एक ठिकाण आहे जिथून आपण प्रभावित होऊ शकतो, जरी धर्म संस्थापक आणि संत-महात्म्ये आपल्या शिष्यांना आणि अनुयायांना प्रत्येकावर प्रेम करण्यास शिकवितात. परंतु शतकानुशतके हळूहळू त्यांची मूळ शिकवण नाहीशी होत आहे. म्हणूनच इतिहासात धर्माच्या नावांवर अनेक युद्धे लढली गेली आहेत, लोकांनी सर्व धर्मांबद्दल आदर आणि उदारमतवाद शिकण्याची गरज आहे, जर नेतृत्व करणाऱ्यानी पक्षपात आणि कट्टरते ऐवजी एकतेला प्रोत्साहन दिले तर धार्मिक कलह आणि द्वेषपूर्ण अपराध संपुष्टात येऊ शकतात. जिथे लोक कोणत्याही छळाच्या भीतीशिवाय आणि कोणत्याही अडथळ्या शिवाय मंदिर, मशीद, चर्च किंवा धार्मिक स्थळांमध्ये पूजा करू शकतील, धार्मिक मार्गदर्शनाने आपापल्या समाजात हा संदेश पोहोचवला तर जग आपल्यासाठी आणि आपल्या भावी पिढ्यांसाठी एक सुरक्षित स्थान बनेल.

मानव एकतेला आपल्या अंतःकरणात सत्य म्हणून घेण्याचा ध्यान-अभ्यास हा एक प्रभावी मार्ग आहे. दररोज ध्यान-अभ्यासाला वेळ दिल्याने आपल्याला स्वतःशी आणि सर्व सृष्टी निर्माण करणाऱ्या दैवीशक्तिशी जोडण्यास मदत होते. ते क्षण प्रेम, शांति आणि आनंदाने भरलेले असतात. जेव्हा आपण आपल्या अंतरी शांत ठिकाणी प्रवेश करताना दर्शन करतो, तेव्हा आपल्याला जाणवते की आपल्यामध्ये असलेला ज्योतिचा प्रकाश सर्व मानवांमध्ये देखील आहे. मग सर्व बाह्य भेद संपतात, मग आपल्याला वेशभूषा, कोणाच्या डोळ्यांचा किंवा केसांचा रंग दिसत नाही, गोरा किंवा काळा, आपल्याला कोणाचे डोळे किंवा बोलण्याची पद्धत दिसत नाही, परंतु आपल्याला त्या परमात्म्याचा ज्योतिचा प्रकाश वेगवेगळ्या शरीरात दिसतो आणि प्रत्येकामध्ये तो त्याच्या जागी सुंदर दिसतो. ज्याप्रमाणे वीज वेगवेगळ्या आकाराच्या बल्बमधून वाहते आणि समान प्रकाश देते, त्याच प्रकारे परमात्म्याचा ज्योतिचा प्रकाश मानव, प्राणी, मासे, पक्षी किंवा सरपटणाऱ्या प्राण्यांमध्येही प्रकाशित होतो. ध्यान-अभ्यासाच्या सरावाने, आपण जीवनातील मानवी एकात्मतेचा अनुभव घेऊन, आपल्या उदाहरणाद्वारे इतरांपर्यंत पोहोचवतो.

संत-महात्मे आणि धर्मसंस्थापक हे मानव एकतेचे जिवंत उदाहरण आहेत, त्यांचा संदेश कोणत्याही एका समूहासाठी नसतो. ते सर्वांवर प्रेम करायला येतात. भले ते कोणत्याही धर्म किंवा राष्ट्रासाचे असोत. संत-महात्मे सर्व लोकांना जोडतात, आपणही आपल्या जीवनात असेच वागले पाहिजे.

आपल्या पूर्वजांच्या द्वेषभावनेला वाढवता कामा नये. हिंसाचार आणि विनाश घडवणाऱ्या परंपरा अंगीकारू नये. प्रेमाचा प्रसार केला पाहिजे. आपापल्या धर्मात किंवा राष्ट्रांमध्ये शिकवले जाणारे जुने पूर्वग्रह संपविले पाहिजेत. अशा प्रकारे आपण मानव एकात्मतेने विश्वशांती प्रस्थापित करू या.

चला तर! आपण कोठे उभे आहोत याचे व्यक्तिशः आत्मपरीक्षण करू या, मनातील द्वेष दूर करून गोड प्रेमाच्या सुगंध भरण्याचा संकल्प करू या, कोणाविषयी भेदभाव असेल तर तो सोडून देऊ या. जर आपण मानवी एकतेचे खरे दूत झालो तर ते आपल्या वागण्यातून दिसून येईल. आपण काही क्षण ध्यान-अभ्यासात व्यतीत करू या, जेणेकरून आपल्या हृदयात मानव एकात्मेची भावना निर्माण होईल आणि आपण जिथे जाऊ तिथे हा आदर्श संदेश आपण सर्वत्र पसरवू शकू. **समाप्त:**


## शब्दकोडे-१८०

**आडवे शब्द**

१. अटीची भाषा ५. भाषांतर करणारा ९. युवराज १२. वस्ती १३. पायधूळ १४. नूतन १६. लाकूड कापण्याचे हत्यार १८. पर्जन्य २०. सैन्याचा दाणागोटा २२. शाब्दिक हजामत २४. सगळा, पिकावरील कव २५. कुराणातील वचने २६. गोड २८. किंमत २९. संतापी ३१. लंडनला पोचलेली प्रा.लक्ष्मण देशपांडेंची लग्नघरची मंडळी! ३२. सहाय्य ३४. टिकावू लाकडाची एक जात ३६. गंध ३७. निमित्त आहे म्हणून ३८. पराजित ४०. खाटीक ४१. खोडी ४२. फुलाची पहिली अवस्था ४३. हद्दपार ४५. आवाज, गोंगाट ४६. घोड्यावरून मारलेली चक्कर ४७. आजच्या आधीचा दिवस ४९. कपाटातील कप्पा ५०. ताजे, नुकतेच आलेले ५२. पातक ५३. वेडावाकडा ५५. बहुतांशी ५७. शंकराजवळचे चर्मवाद्य ५८. ताब्यात, कह्यात (आलेली व्यक्ती, विद्या इ.) ५९. विटी-दांडूतील खड्डा ६०. गीतातील शब्दालंकार ६२. वाकडाच्या विरुद्ध ६३. सततचे नामस्मरण ६४. ताबा, अंमल ६५. उलट, विरुद्ध ६८. पूर्वज ७०. नकला ककरणारा ७१. तोटा ७४. ओंजळ भरून ७५. पंजाबमधील एक नदी ७६. खाल्ल्यास माघार

**उभे शब्द**

१. आजूबाजूला २. पृथ्वी ३. युद्धातील समेट ४. रत्न ५. एक तुरेदार काटेरी फळ ६. वाचणारा ७. किंमत ८. बळकट ९. हिंदीत रहस्य १०. बारा वर्षांच्या आतील मुलगा ११. बळेच घोड्यावर बसवण्यात आलेला १५. शूर पुत्राला जन्म देणारी १६. मुलांच्या भाषेत अंबोला १७. व्रत १९. सर्व २१. दमऱ्यांनी अशी हवा त्रासदायक २२. कोवळ्या दुधाचा पदार्थ २३. भिकार, फडतूस २७. युद्ध २८. सुगंधी पांढरे उन्हाळी फूल ३०. घागरा ३३. भक्कम, मजबूत ३४. भेग, चीर ३५. त्वचा ३६. खराब ३७. पुण्यातील एक प्रसिद्ध महाविद्यालयाच्या नावाची आद्याक्षरे ३७अ. संध्याकाळ ३९. जमीन, पृथ्वी ४१. चरण्याची जागा ४४. पचनास सहाय्यकारक, उदा: हिंग, सुपारी इ. ४७. लग्नासाठी महत्त्वाची खरेदी ४८. खूप ४९. कडाक्याचे भांडण ५०. आश्चर्य ५१. ताळमेळ, उत्कट इच्छा ५३. मद्य ५४. खेळी, खेळण्याची पाळी ५५. विश्व, दुनिया ५६. एक गळीत धान्य ६१. भ्रमर ६३. स्वदेशी सैनिक ६४. डोळ्यावर प्रतिकूल परिणाम करणारे केसाचे प्रसाधन ६५. प्रगती ६६. पुन्हा ६७. मुलगा ६९. माराची उमटलेली खूण ७०. आकाश ७२. याच्या नावाखाली भुई कशाला धोपटायची? ७३. निकड, गरज



## शब्दकोडे १७९ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.रामराम ५.पाप्याचे पितर ९.नाट १०.जरब ११.दमदाटी १२.डमडम १३.तालेवार १५.लचक १७.देश १८.डाग २०.वकील २१.ससा कासव २३.जबरदस्त २६.नरवर २८.रवाळ २९.पांडव ३०.निवारक ३२.अवकळा ३३.बाग ३४.लगत ३६.रजत ३७.जर ३८.मानव ३९.अनेक ४०.स्तव ४२.जन्म दाखला ४३.तगर ४४.वराह ४६.माल ४८.जमात ५०.तलवार ५३.कालव ५४.सवाल ५७.वारसदार ५८.सहाय्यक ५९.सनई ६१.शहर ६५.गर ६७.मानव ६९.रसकस ७०.ताल ७१.रमताराम ७४.दान ७५.हावरट ७६.समोर ७७.नरवाहन ७८.कण

**उभे उत्तर**

१.राजवाडा २.मर ३.राबता ४.समर ५.पाटीलकी ६.चेतक ७.तडकसार ८.रम ९.नामदेव ११.दवा १४.लेकुरवाळा १६.चलनवलन १९.गज २१.सवलत २२.सलवार कमीज २४.बरकत २५.दळ २७.चुकतमाकत २९.पांग ३१.रज ३२.अवास्तव ३३.बारदान ३५.गवत ३७.जन्म ३८.मालामाल ३९.अरण्यवास ४१.वरात ४५.हलवाई ४७.लवकुश ४९.मादक ५१.वार ५२.रसना ५३.कारखानदार ५५.लहानसहान ५६.रासगरबा ६०.नरम ६२.हरहर ६३.रस ६४.पलटण ६६.तारा ६८.वन ७०.तारक ७२.तार ७३.मस

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## निधन वार्ता

### बाबुवंतीबाई सूर्यवंशी



**पिंपळनेर ।** चिपलीपाडा ता साक्री येथील ग.भा. बाबुवंती बाई गोकुळ सूर्यवंशी (वय ८४) यांचे दि १६ सप्टेबर रोजी हृदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्या इंजि मोहन सूर्यवंशी भाजपा साक्री विधानसभा प्रमुख, अरुण सूर्यवंशी मा.सरपंच चिपलीपाडा यांच्या आई तर लीला सूर्यवंशी भाजपा जिल्हा सरचिटणीस व भारती सूर्यवंशी यांच्या सासूबाई होत्या.

### शरद नानाजी शिंदे



**पिंपळनेर ।** सामोडे अनुराधा कॉलनीतील शरद नानाजी शिंदे यांचे दि.१३ सप्टेबर रोजी निधन झाले. ते कर्म. आ.मा. पाटील पब्लिक एज्युकेशन सोसायटीच्या वस्तीगृहात अधीक्षक म्हणून नोकरीस होते. त्यांचे पश्चात पत्नी, एक सुपुत्र, दोन सुकन्या, दोन बहीणी, भाऊ, भावजाई असा परीवार आहे. चंद्रकांत शरद शिंदे यांचे वडील व गोपाळ बिरारीस यांचे ते मेहुणे होते.

### प्रभाकर कोठावदे



**पिंपळनेर ।** येथील मेन बाजार पेठ मधील रहिवाशी कै. प्रभाकर दामोदर कोठावदे (वय ८४) यांचे ता. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ७.१० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते संजय कोठावदे, नितीन कोठावदे यांचे वडील होते.

# शिक्षकाची आंतरराष्ट्रीय विक्रमाला गवसणी

**नाशिक । प्रतिनिधी**

विवेकानंद केंद्र कन्याकुमारी नाशिक शाखेचे माजी नगरप्रमुख प्रा. अमोल अहिरे यांनी गेल्या सहा वर्षांपासून (३१ मे २०१७ पासून) संकल्पपूर्वक अखंडित व सातत्यपूर्णरित्या २२६० दिवस विवेकानंदांच्या विचारांचा प्रचार व प्रसार सोशल मिडियाच्या माध्यमातून करत एका जागतिक विक्रमाला गवसणी घातली आहे. त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिक्षक शर्मिष्ठा वालावलकर यांच्या हस्ते जागतिक विक्रमाचे प्रमाणपत्र देण्यात आले.



### पाच भाषांमधून प्रचार

**मराठी, हिंदी, इंग्रजी, कानडी व तमिळ या पाच भाषांमधून 'विवेक विचार संदेश' प्रसार होतो. वॉटस्अप, फेसबुक, ईमेल, कुटुंब ॲप्स, विविध वृत्तपत्र आदी समाज माध्यमातून तब्बल तीन लाख लोकांपर्यंत सदर संदेश दररोज पहाटेच्या वेळी प्रसारित केला जात आहे. या संदेशाबरोबर दिनविशेष, तिथी, वार, भारतीय सौर, युगाब्द आदी देत असल्याने राज्यातील शंभराहून अधिक शाळेच्या फलकावर शिक्षकांकडून या संदेशाचे दररोज लेखन केले जात आहे. त्यातील काही शाळेंच्या विद्यार्थ्यांनी 'विवेक विचार संदेश' नामक नोंदवहीत हे विचार संकलित केले आहेत.**

मालेगाव तालुक्यातील जळगाव निंबायती येथील जी. वाय. पाटील कनिष्ठ महाविद्यालयात गेल्या सोळा वर्षांपासून प्राध्यापक पदावर कार्यरत प्रा. अहिरे यांनी २०१७ मध्ये विवेकानंद केंद्राच्या सात दिवसीय निवासी व्यक्तीमत्व विकास शिबिरात सहभाग घेतला होता. समारोप कार्यक्रमात त्यांनी दररोज विवेकानंदांच्या साहित्याचे वाचन करुन 'विवेक विचार' नामक संदेशातून त्यातील तत्त्वाचा प्रचार व प्रसार सोशल मिडियाच्या माध्यमातून करण्याचा संकल्प केला होता. वर्षभरानंतर नियमित वाचकांनी आग्रह धरल्याने सदर उपक्रम सलगपणे सहा वर्षापासून राबविला जात असून, त्याची नोंद जागतिक विक्रमात झाली आहे.

या सातत्यपूर्ण उपक्रमाची दखल ब्राव्हो इंटरनॅशनल बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड संघटनेने घेतली आहे. त्यांनी फेसबुकवरील संदेशांची पडताळणी केली असता, त्यात अखंडितपणा दिसून आला. यातील सत्यता पडताळल्यावर नुकतेच ब्राव्हो संघटनेकडून प्रा. अहिरे यांना जागतिक विक्रम केल्याबद्दल प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले. यापूर्वी अहिरे यांनी विद्यार्थ्यांची अध्यापनात रुची वाढावी त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहे. शिवाय विविध दैनिकांतून अनेकाविध विषयावर लेखन केले आहे. तसेच अनेक शाळा, महाविद्यालयातून व्याख्याने दिली आहे. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. आगामी काळात लिखित विचारांबरोबर 'विवेक वाणी' या ध्वनीमुद्रित संदेशांचे प्रसारण करण्याची इच्छा अहिरे यांनी यावेळी व्यक्त केली.

# जपानी लोकांप्रमाणेच बुद्धी वापरून नवीन शोध लावावे- डॉ.भानोसे

**नाशिक । प्रतिनिधी**

जपानमध्ये गणेश उत्सव नसतानाही त्या लोकांनी आपल्यातील गणेशाची पूजा करून आपली बुद्धी वापरून नवनिर्मिती केली आहे. उत्तम दर्जा, ग्राहक समाधान, सुरक्षितता, परवडणारी किंमत आणि उत्पादकतेच्या जोरावर त्यांची उत्पादने जगात लोकप्रिय होत आहे. जपान हे राष्ट्र आर्थिक सबळ होत आहे. आपण भारतीय फक्त ढोल ताशे वाजवत गणेश उत्सव साजरा करत आहोत. परंतु बुद्धी वापरून नवनिर्मितीमध्ये फार मागे आहोत. तेव्हा आपणही जपानी लोकांप्रमाणेच बुद्धी वापरून नवीन शोध लावले पाहिजे, आपले उत्पादने जगात विकले पाहिजे तरच भारत समर्थ होईल व सर्वांगीण विकास होईल.



जपानी व्यवस्थापन तंत्र हे भारतीय संस्कृती व बुद्ध तत्वज्ञानावर आधारलेले आहे. त्याचे आचरण केले तर सर्वांचा विकास निश्चित आहे. असे प्रतिपादन सुप्रसिद्ध औद्योगिक कीर्तनकार आणि जपानी व्यवस्थापन तज्ञ डॉ. संदीप भानोसे यांनी केले. सुचेता भानोसे-कुलकर्णी यांच्या स्मृतीदिना निमित्त नासिक येथील समाजकार्य महाविद्यालयात 'जपानी व्यवस्थापन तंत्र' यावर गरुडझेप प्रतिष्ठानने निशुल्क कार्यशाळा आयोजित केली होती. प्राचार्य विलास देशमुख यांनी ओळख व प्रास्ताविक केले. प्रा. चंद्रप्रभा निकम यांनी डॉ. भानोसे यांचे स्वागत केले. डॉ. भानोसे यांनी अनेक उदहरण देत सांगितले कि, भारतीय उद्योगाने आपली मानसिकता सकारात्मक केली पाहिजे, विचारात लवचिकता आणली पाहिजे. नवीन तंत्र व तत्व आचरणात आणले तर यश प्राप्ती होऊ शकेल. सूत्रसंचालन डॉ. सोनल बैरागी यांनी केले. डॉ. जगताप, प्रा.प्रतिभा पगार, प्रा.सुनिता जगताप, प्रा.चंद्रप्रभा निकम, प्रा.मनिषा शुक्ला, प्रा. सोनल बैरागी, प्रतिमा पवार यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी अजय अहिरे, स्नेहल चव्हाण, पूजा भोईर, रोहित अहिरे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभार प्रदर्शन प्रणिता जाधव व दिपाली वडनरे यांनी केले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपातर्फे सेवा पंधरवडा

**भाजपाचे नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांची माहिती**

**नाशिक । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या काळात सेवा पंधरवडा आयोजित केला असून या अभियानात विविध सेवा कार्यक्रम राबविले जाणार आहेत. अशी माहिती भाजपाचे नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी दिली.

प्रशांत जाधव यांनी सांगितले की, सेवा पंधरवड्यात युवा मोर्चातर्फे रक्तदान व आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर मोदी सरकार आणि राज्य सरकारच्या गोरगरिबांच्या कल्याणासाठीच्या योजनांची माहिती पोहोचवण्यासाठी वस्ती संपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. त्याचबरोबर २ ऑक्टोबरला महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छतेचे उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. स्वातंत्र्य संग्रामात योगदान दिलेल्या महापुरूषांचे पुतळे तसेच परिसर स्वच्छ करण्याचे कार्यक्रमही होणार आहेत. आयुष्यमान भव सप्ताहानिमित्त गरजू जनतेकरिता आयुष्मान कार्ड वाटप तसेच नोंदणी कार्यक्रमाचेही आयोजन केले जाणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्व, विकासाची दृष्टी, धोरणे आणि त्यांना मिळालेले यश या विषयावरील प्रदर्शनीही आयोजित केली जाणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेले ९ वर्षात केंद्र सरकारच्या माध्यमातून अंत्योदयाचा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी अनेक योजना सुरू केल्या. सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणासाठी वचनबद्ध असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पक्ष संघटनेकडून त्यांचा सेवाभाव विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे, असेही प्रशांत जाधव यांनी सांगितले.

---

ॲड.पी.एम.चौधरी

निशाणी नं. ६

## जाहिर नोटीस

**येथिल मे. दिवाणी न्यायाधीश व.स्तर सो. धुळे यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज नं. १०८७/२०२३**

१. श्री. नाना दौलत पाटील. (पती)
रा. मु. पो. निमडाळे, ता. जि. धुळे
२. सौ. सीमा शशीकांत पाटील (मुलगी)
रा. ३७४ / ३४, देशमुख बंगला जवळ, अमळनेर, जळगाव, महाराष्ट्र, ४२५४०१
३. सौ. मिनाबाई शांताराम पाटील (मुलगी) रा. ८९ब, डांभूर्णी पुरा, मु.पो. चहार्डी ता. चोपडा, जि. जळगाव, ४२५१०७
४. प्रकाश नाना पाटील (मुलगा)
रा. मु. पो. निमडाळे, ता. जि. धुळे **...अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

कै.इंदुबाई नाना पाटील **...जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश व स्तर सो. यांच्या न्यायालयात दि. ६/९/२०२३ रोजी दि.कि. अर्ज नं १०८७/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. इंदुबाई नाना पाटिल यांचे वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ दि. ०६/११/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वैगरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क स्तर कोर्ट नं... ९ यांचे न्यायालयात उपरोक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दिनांक-१५/०९/२०२३ (शिक्का) आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** — **मे. दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.९**
**अधिक्षक** — **मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.९**

---

# दशक्रिया विधी कार्यक्रमात कर्मकांड टाळून बहुजन महापुरुषांचे पूजन

**रविवारी मरण आणि तोरण प्रसंगातील अनिष्ट रूढींवर व्याख्यान**

**नाशिक । प्रतिनिधी**

धुळे तालुक्यातील बोरकुंड येथील कृषीभूषण वसंतराव भदाणे यांच्या स्मृतिनिमित्त रविवार दिनांक १७ रोजी सकाळी ९ वाजता बोरकुंड येथे आयोजित कार्यक्रमात मरण आणि तोरण प्रसंगातील चुकीच्या प्रथा व वास्तव या विषयावर शिवव्याख्याते व आहिराणी भाषा साहित्याचे अभ्यासक प्रा. सदाशिव सूर्यवंशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

कृषिक्षेत्रात बोरकुंड पंचक्रोशीत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रयोगशील शेतकऱ्यांना वसंतराव भदाणे यांच्या स्मरणार्थ कृषिवसंत गौरवरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. उपस्थित ग्रामस्थांना मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर लिखिततोरण व मरण एक सामाजिक समस्या व शिवरायांचा राज्याभिषेक या पुस्तकाचे प्रकाशन तसेच ग्रंथवाटप व वृक्षरोप वाटप कार्यक्रम होणार आहे. यावेळी मराठा सेवा संघाचे कोअर टीम पदाधिकारी प्रा. अर्जुनराव तनपुरे, खासदार डॉ. सुभाष भामरे, आमदार कुणाल पाटील, आमदार सुधीर तांबे, उपजिल्हाधिकारी महेंद्र पवार, धुळे निवासी जिल्हाधिकारी नितीन गावंडे, निफाड प्रांत अधिकारी हेमांगी पाटील, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ उपकुलगुरु प्रा. डॉ. शोभा शिंदे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी हेमंत भदाणे, मलकापुर प्रांताधिकारी मनोज देशमुख, कन्नड तहसीलदार विद्याचरण कडवकर, उल्हास देवरे, नायब तहसीलदार पंकज पाटील, अधीक्षक अभियंता इंजी.यशवंत भदाणे, कृषी सभापती संग्राम पाटील, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष रणजीतराजे भोसले, कालिका संस्थेचे उपाध्यक्ष विजय गजानन पाटील, राजर्षी शाहू इंजीनियरिंग कॉलेज प्राचार्य प्रा. प्रशांत पाटील, रेस्क्यू शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मधुकर सूर्यवंशी, सचिव सुनंदा सूर्यवंशी, संचालक हुकुमचंद पाटील, जिल्हा परिषद सदस्य शालिनी भदाणे, अनिता भदाणे, लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब भदाणे, माजी सभापती प्रभाकर भदाणे, उपसभापती देवेंद्र माळी, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष संदीप पाटील, राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. संजय पाटील, राज्य उपाध्यक्ष सुरेंद्र पाटील, के. डी. पाटील, राम पवार, मराठा आरोग्य कक्ष जिल्हाध्यक्ष बाळासाहेब ठाकरे, उद्योजक कक्ष जिल्हाध्यक्ष इंजी. विशाल देसले, जिजाऊ ब्रिगेड प्रदेश उपाध्यक्ष सुलभा कुवर, जिल्हाध्यक्ष नूतन पाटिल, नाशिक जिल्हाध्यक्ष इंजि. शिल्पा देशमुख, बोरकुंड सरपंच सुनिता भदाणे, रतनपुरा सरपंच दगडू माळी, सरपंच डॉ. संदिप पाटिल, डॉ. संजय शिंदे, संतोष भदाणे, कृष्णा चांदगुडे, राजेंद्र भदाणे, अनिल भदाणे, याच्यासह राजकीय, प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. बोरकुंड पंचक्रोशितील प्रयोगशील २० शेतकऱ्यांचा कृषिवसंत पुरस्काराने सन्मान करण्यात येणार असून त्यात प्रयोगशील शेती करणारे अशोक पंढरीनाथ भदाणे,सतीश हुकुम माळी,राजेंद्र प्रभाकर भदाणे, प्रभाकर भदाणे,घमन भदाणे, भटू वानखेडे, मनीलाल माळी, प्रकाश माळी, नितीन माळी, भटू कुंभार, समाधान माळी दोंदवाड, बापू जाधव, विवेक भोई, भाऊसाहेब माळी, दीपक पाटील, गणेश कठाळे जितेंद्र वाघ, सरपंच प्रभाकर कुरणे, विकास भदाणे, रावसाहेब गढरी, आनंदराव भदाणे या कर्तुत्ववान शेतकऱ्यांसह संस्थागटात बोरी परिसर शेतकरी राजा गटाचे अध्यक्ष पतिंगराव भदाणे व महिला खान्देशी फार्मर प्रोड्यूसर कंपनीच्या अध्यक्षा भारती नरेंद्र भदाणे यांना मानचिन्ह देऊन सन्मानित केले जाणार आहे.

---

## CHANGE NAME

My Old Name Was Samrudha Anil Shah And New Name is Samruddha Anil Shah
**ADDRESS -** Plot No. 8/A Muncipal Colny Devpur Dhule

---

# खडक माळेगाव येथील जवान योगेश शिंदे यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंतिम संस्कार

**लासलगाव । वार्ताहर**

भारतीय सैन्य दलात राजस्थान येथे सेवेत असलेले खडक माळेगाव चे सुपुत्र योगेश सुखदेव शिंदे यांचे शुक्रवारी अपघाती निधन झाले.काल शनिवारी खडक माळेगाव येथील प्राथमिक शाळेच्या प्रांगणात त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात आले.

शनिवारी दुपारी देवळाली कॅम्प येथून भारतीय सैन्याच्या गाडीतून योगेश सुखदेव शिंदे यांचे पार्थिव देह खडक माळेगाव येथे आणल्यानंतर फुलांनी सजवलेल्या भारतीय सैन्याच्या गाडीतून योगेश शिंदे यांच्या पार्थिवाची गावातून अंत्ययात्रा काढण्यात आली.यावेळी'योगेश शिंदे अमर रहे,भारत माता की जय'च्या घोषणा देण्यात आल्या. अंत्ययात्रा प्राथमिक शाळेच्या प्रांगणात आल्यानंतर भारतीय सैन्याच्या अधिकाऱ्यांनी त्यांना मानवंदना दिल्यानंतर योगेश शिंदे यांचे भाऊ श्रीहरी शिंदे यांनी त्यांच्या पार्थिव देहाला अग्निडाग दिला.यावेळी योगेश शिंदे यांचे वडील सुखदेव काशिनाथ शिंदे,आई मीराबाई सुखदेव शिंदे,पत्नी मोहिनी शिंदे व तिन वर्षाचा मुलगा शिवराज(दादु) व भाऊ श्रीहरी शिंदे यांनी अंतिम दर्शन घेतले.



### मंत्री छगन भुजबळ यांच्या कडून श्रध्दांजली

**भारतीय सैन्यात कार्यरत असलेले आपल्या नाशिक जिल्ह्यातील खडक माळेगावचे (ता. निफाड) सुपुत्र योगेश सुखदेव शिंदे यांच्या अपघाती निधनाची घटना अत्यंत दुर्दैवी आहे.भारतमातेच्या या वीर सुपुत्रास भावपूर्ण श्रद्धांजली! गावी सुटीवर आले असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. शिंदे कुटुंबियांच्या दु:खात मी सहभागी आहे.त्यांना या दु: खातून सावरण्याचे बळ मिळो व मृतात्म्यास सद्गती लाभो,हीच ईश्वरचरणी प्रार्थना**

योगेश सुखदेव शिंदे हे पोळा सणा निमित सुट्टी घेऊन खडक माळेगाव येथे घरी आले होते.पोळ्याचा सण साजरा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी शुक्रवारी ते काही कामानिमित्त मोटारसायकल वरून वनसगाव रस्त्यावरून जात असताना त्याच वेळी समोरून येणाऱ्या पीक अपगाडी व त्यांच्या मोटारसायकल यांच्यात जोरदार धडक होऊन योगेश सुखदेव शिंदे यांचा जागीच मृत्यू झाला होता. या अपघातानंतर रात्री त्यांचा मृतदेह पुढील तपासणीसाठी देवळाली कॅम्प येथील आर्मी सेंटर येथे पाठविण्यात आला होता.

या अंतिम संस्कार प्रसंगी देवळाली कॅम्प येथील भारतीय सैन्यातील अधिकारी मेजर छत्री,निफाड चे तहसीलदार शरद घोरपडे, ना छगन भुजबळ यांचे स्वीय सहायक बाळासाहेब लोखंडे, ना भारती पवार यांचे स्विय सहायक डॉ उमेश काळे, माजी जिल्हा परिषद सदस्य डी के जगताप, लासलगाव बाजार समितीचे संचालक राजेंद्र बोरगुडे, माजी पंचायत समिती सदस्य शिवा सुरासे, निफाड चे उपनगराध्यक्ष अनिल कुंदे,सोमनाथ पानगव्हाणे, बबनराव शिंदे, खडक माळेगाव चे सरपंच जगदीश पवार, ग्रामपंचायत सदस्य, विकास रायते, ह भ प निवृत्ती महाराज रायते, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे सर्व पदाधिकारी तसेच गावातील सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

ॲड.पी.एम.चौधरी

निशाणी नं. ६

## जाहिर नोटीस

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीश व स्तर सो. धुळे यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज नं. १०८८/२०२३**

सौ. आशाबाई भालेराव बोरसे उ.व :- ५५, धंदा:-घरकाम
रा.प्लॉट नं. ५३- ब नकाणे रोड, श्रध्दा नगर, देवपुर, धुळे **...अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

कै. शकुंतलाबाई भास्कर पाटील
मयतापुर्वीचा पत्ता :- मु. पो. निमडाळे, ता.जि.धुळे **...जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश व स्तर सो. यांच्या न्यायालयात दि.६/९/२०२३ रोजी दि.कि. अर्ज नं १०८८/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. शकुंतलाबाई भास्कर पाटील यांचे वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ.दि. ३०/१०/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वैगरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर कोर्ट नं. १ यांचे न्यायालयात उपरोक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दिनांक-१५/०९/२०२३ (शिक्का) आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** — **मे. दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.१**
**अधिक्षक** — **मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.१**

---

ॲड. यु. व्हि. मराठे

निशाणी नं. ४५/२०१४

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. मा. जिल्हा न्यायाधिश साहेब धुळे यांचे कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३५/२०१४**

१) सनमुखबी / मर्द नशीरबेग मिर्झा ..... मयत
धंदा - घरकाम रा. निजामपुर ता. साक्री जि. धुळे
२) रानुबी मर्द सलीम पठाण उ.व. ५५ वर्षे
धंदा - घरकाम - रा. भुसावळ पोलीस लाईन
ता. भुसावळ जि. जळगाव **...अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

१) बशीरबेग कमुबेग मिर्झा..... मयत (वारस)
५ (१) लडडम शेख कासम उ. व. सज्ञान
५(२) लतीफ शेख कासम उ. व. सज्ञान
५(३) रफिक शेख कासम उ. व. सज्ञान
सर्व रा. नंदुरबार मुस्लीम मौहल्ला ता. जि. नंदुरबार **...जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदारांनी या मे. कोर्टात सि.प्रो. कोड ऑर्डर २२ रुल ९/११ अन्वने रे.मु.नं. ३१/१९९४ चा दावा रिस्टोअर/पुन्हा फाईलवर घेणेकरीता सदरील जाबदेणार यांचे विरुध्द दाखल केलेला आहे. तुम्ही जाबदेणार नं. ५ चे कायदेशीर वारस आहेत तुम्ही वेळोवेळी नोटीस काढुनही जाणुनबुजुन हजर होत नाहीत करीता सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द करणे भाग झाले आहे.

त्याकरीता या नोटीसीने कळविण्यात येते वरील वारसांनी स्वत: अगर वकीलामार्फत नचुकता ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत सकाळी १०.३० वाजता या मे. कोर्टात हजर राहावे. जर तुम्ही गैरहजर राहिल्यास तुमचे विरुध्द एकतर्फा आदेश होईल व तुमचे काही म्हणणे नाही असे धरण्यात येईल व योग्य ते आदेश करण्यात येतील.

सदरची नोटीस मे. कोर्टाच्या आदेशाने सही शिक्का सह प्रसिद्धीस दिली असे.

दि. १५/०९/२०२३ (शिक्का)

**जिल्हा न्यायालय, धुळे**
**सुपरीटेंडेंन्ट (न्यायालय) जिल्हा न्यायालय, धुळे**

## न्यूज कॉलम

### तांडे गावाच्या शिवारात अपघातात तरुण ठार

धुळे । होळ शिरपूर तालुक्यातील तांडे गावाच्या शिवारात भरधाव वेगातील मोटारसायकल (एमएच १८ सी व्हि १३९४ ) गतीरोधकमूळे स्लिप झाली. या अपघातात मोटारसायकलवर मागे बसलेला तरुण रोशन रतीलाल पावरा ( वय १८), रतीलाल बलजी पावरा ( दोघे रा. चिलारे, ता. शिरपूर) हे जखमी झाले. उपचारापूर्वी रोशन याचा मृत्यू झाला. या प्रकरणी वाहन चालक तथा मृत रोशन याचे वडील रतीलाल यांच्या विरोधात थाळनेर पोलिसात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला आहे.

### नगावबारी परिसरातून मुलीचे अपहरण

धुळे । देवपुरातील नगावबारी परिसरात राहणारी १७ वर्षीय मुलगी बेपत्ता झाली आहे. शोध घेऊनही ती मिळाली नाही. याबाबत मुलीच्या आईने पश्चिम देवपुर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यात तुषार मालचे याच्यावर संशय व्यक्त करण्यात आला आहे.

# जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत खर्चाचे परिपुर्ण प्रस्ताव त्वरीत सादर करावे : जिल्हाधिकारी

धुळे । प्रतिनिधी



## जिल्हा विकास आराखडा त्वरीत सादर करावा

**सन २०४७ पर्यंत देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रीलियन डॉलर तर राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रीलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे शासनाचे नियोजन असून यासाठी जिल्हा विकास आराखडयातील निगडीत विभागाने आपल्या विभागाचा जिल्हा विकास आराखडा त्वरीत सादर करावा. या आराखड्यात शेती, कृषी प्रक्रिया, खाद्यतेल, टेक्सटाईल, केमिकल, सिमेंट, स्टील,ऊर्जा आणि इतर सेवा दुग्धव्यवसाय,कुक्कुटपालन, मासेमारी, अभियांत्रिकी, उद्योग, सिंचन, बांधकाम, बँकिंग , कौशल्य, आरोग्य, शिक्षण, क्रीडा व कल्याण बाबीशी निगडीत त्या तया विभागाचे अल्प, मध्यम, व दिर्घ मुदतीचे ध्येय निश्चित करुन हे ध्येय साध्य करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेसह वस्तुस्थितीदर्शक आकडेवारीसह परीपुर्ण अहवाल त्वरीत सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी यावेळी दिल्या.**

जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२०२४ आर्थिक वर्षातील खर्चाचे परिपुर्ण प्रस्ताव त्वरीत सादर करुन प्राप्त निधी विहीत कालावधीत खर्च करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्या आहेत.

येथील जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हा वार्षिक योजनेची सर्वसाधारण, आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजनांची आढावा बैठक जिल्हाधिकारी श्री. गोयल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, यावेळी ते बोलत होते. या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, मनपा आयुक्त अमिता दगडे-पाटील, उपवनसंरक्षक नितीन सिंग, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक आर.एम.जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गोयल म्हणाले की, शासनाने सन २०२३-२०२४ करीता विभागांच्या मागणीप्रमाणे बीडीएस प्रणालीवर निधी उपलब्ध करुन दिला आहे. प्राप्त झालेल्या निधीचे योग्य नियोजन करुन तांत्रिक मान्यतेसह प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव त्वरीत सादर करावेत. प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असल्यास निधी मागणी त्वरीत करावी. मागील वर्षाचा स्पील अनुदानाची मागणी करतांना जीओ टॅग छायाचित्रासह प्रस्तावावर विभाग प्रमुखांच्या स्वाक्षरीसह परिपुर्ण प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा. जुने कामे पुर्ण केल्याशिवाय नवीन कामे प्रस्तावीत करु नयेत.

जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन यंत्रणांनी विकास कामांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी योग्य नियोजन करावे. जिल्हा परिषद, जलसंधारण विभागाने जलयुक्त शिवार योजनेत मोठ्या प्रमाणात पाझर तलाव, कोल्हापूर बंधारेची कामे घ्यावीत. नवीन स्मशानभूमी, शालेय वर्ग खोली, स्वच्छतागृहाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावेत. आरोग्य विभाग व पशुसंवर्धन विभागाने औषधे खरेदी करावीत. जलजीवन मिशन अंतर्गत आश्रमशाळेत पाणीपुरवठाची कामे प्रस्तावीत करावीत. अनुसूचित जाती उपयोजना, अनुसूचित जमाती उपयोजना, मानव विकास मिशनअंतर्गत गत वर्षातील तसेच चालू वर्षातील मंजूर कामे पुर्ण करावीत. जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती हटकर तसेच प्रकलप अधिकारी प्रमोद पाटील यांनी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत उपलब्ध निधी व खर्चाची माहिती यावेळी दिली. बैठकीत चालू वर्षाचा मंजूर निधी व झालेला खर्च व पुढील वर्षांच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# फिट धुळे-हेल्दी धुळे'साठी प्रयत्न!

## जिल्ह्यात १७ सप्टेंबरपासून 'आयुष्मान भव' मोहीम

धुळे । प्रतिनिधी

केंद्र सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी आयुष्मान भव मोहीम धुळे जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबरदरम्यान राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या माध्यमातून 'फिट धुळे-हेल्दी धुळे' या संकल्पनेला मूर्त रूप देण्याचा आमचा प्रयत्न आहे. या मोहिमेत 'आयुष्मान कार्ड' व 'आभा कार्ड' लाभार्थ्यांना उपलब्ध करून देणे प्रमुख लक्ष्य आहे. या मोहिमेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा जिल्ह्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले.

आयुष्मान भव मोहिमेच्या अनुषंगाने शुक्रवारी (ता. १५) सायंकाळी साडेचारला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सातपुडा सभागृहात पत्रकार परिषद झाली. जिल्हाधिकारी गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांनी मोहिमेची माहिती दिली. जिल्हा शल्यचिकित्सक दत्ता देवगावकर, जिल्हा आरोग्याधिकारी सचिन बोडके आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गोयल म्हणाले, की आयुष्मान भव मोहिमेंतर्गत आरोग्यवर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रात तीन हजार ६८० आरोग्य मेळावे घेण्यात येणार आहेत. पहिल्या आठवड्यात असंसर्गजन्य आजार सेवा, दुसऱ्या आठवड्यात क्षयरोग, कुष्ठरोग व इतर संसर्गजन्य आजार, तिसऱ्या आठवड्यात माता, बालआरोग्य व पोषण आरोग्य सुविधा, चौथ्या आठवड्यात सिकलसेल तपासणी व नेत्ररोग चिकित्सा, कान, नाक व घसा तपासणी आदी सेवा मेळाव्याद्वारे उपलब्ध असतील. याशिवाय १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान सेवा पंधरवडा राबविण्यात येणार आहे. यात स्वच्छता मोहीम, अवयवदानाविषयी जनजागृती तसेच रक्तदान शिबिरे आयोजित केली जातील. २ ऑक्टोबरला सर्व आरोग्यवर्धिनी केंद्र व ग्रामसभा, आयुष्मान सभांचे आयोजनही करण्यात येणार आहे. मोहिमेंतर्गत अंगणवाडी व प्राथमिक शाळांतील मुलांची तसेच १८ वर्षांवरील सर्व पुरुषांची आरोग्य तपासणी व निदान व उपचार करण्यात येईल.

# धुळे मनपाची क्षयरुग्णांना मोफत पोषण आहार पुरवण्यात राज्यामध्ये आघाडी

### उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्यपाल, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव

धुळे । प्रतिनिधी




राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत कम्युनिटी सपोर्ट टू टीबी पेशंट हा उपक्रम सर्व जिल्ह्यात राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत क्षयरोग रुग्णांना सामाजिक संस्था, दानशूर व्यक्तींच्या मदतीने पोषण आहार देण्यात आला. या कामात उत्कृष्ट कामगिरी केल्याने महापालिकेचे शहर क्षयरोग अधिकारी डॉ. जे. सी. पाटील यांचा राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते गौरव झाला.

कम्युनिटी सपोर्ट टू टीबी पेशंट या उपक्रमांतर्गत क्षयरुग्णांना ६ महिने ते ३ वर्षांपर्यंत दानशूरांच्या माध्यमातून पोषण आहार दिला जातो. त्यानुसार मनपा क्षेत्रात १०५ निक्षय मित्रांनी ४६३ क्षयरुग्णांना पोषण आहार देण्यासाठी दत्तक घेतले. वर्षभरात १ हजार ४५३ क्षयरुग्णांना पोषण आहार देण्यात आला. त्यासाठी मनपाचे क्षयरोग अधिकारी डॉ. जे. सी. पाटील व शहर क्षयरोग केंद्रातील कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले. महापालिकेच्या कामाची दखल घेत आयुष्यमान भव योजनेंतर्गत राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत, अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्या हस्ते शहर क्षयरोग अधिकारी डॉ. जे. सी. पाटील यांचा सत्कार झाला. डॉ. पाटील यांनी समाजातील दानशूर व्यक्ती व संस्थांना भेटून निक्षय मित्रांची संख्या वाढवली.

### शिरडाणे प्र.नेर येथे शेतीशाळा संपन्न

धुळे । कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा व कृषि विभाग,धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने शिरडाने प्र.नेर येथे बाजरी पिकावर शेतकरी शेतीशाळा संपन्न झाली. या शेतीशाळेस प्रगतशील शेतकरी राजू पाटील यांनी बाजरी पिकांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. आत्माचे योगेश पाटील यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती यावेळी शेतकऱ्यांना दिली.

या शेतीशाळेस प्रकल्प संचालक आत्मा एन.एम. कोळपकर, प्रकल्प उपसंचालक विनय बोरसे, तालुका कृषि अधिकारी वाल्मिक प्रकाश, बीटीएम योगेश पाटील, लुपिन फाउंडेशनचे राजेंद्र मासुळे, तसेच वणी ब्रु व शिरडाने प्र.नेर येथील शेतकरी उपस्थित होते.

# धुळ्याचा राजा हिंदू एकता गणेशोत्सवाच्या मंडपाचे भूमिपूजन

धुळे । प्रतिनिधी



धुळ्याचा राजा हिंदू एकता गणेशोत्सवाच्या मंडपाचे भूमिपूजन संपन्न झाले. यावेळी अध्यक्ष व व्यापारी आघाडीचे प्रमुख नगरसेवक हर्षकुमार जी रेलन

यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कुमार मराठे, विजय पाच्छापूरकर, अनिल थोरात, दिनेश धात्रक, पवन गवळी, सागर लाड, पवन जाजु, मयुर गवळी, निलेश जैन, तुषार भागवत, प्रथमेश गोरे, रोहित चौधरी, भूषण गवळी, मनीष शर्मा, रामेश्वर चौधरी, बापू सोनवणे, आबा ठोसर, सानी चौधरी, निखिल वाघ आदी उपस्थित होते.

समितीची बैठक माजी महापौर व संघटनेचे संस्थापक कार्यकर्ते प्रदीप नाना करपे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सन २०२३ च्या होणाऱ्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने यावर्षीचे अध्यक्ष म्हणून व्यापारी आघाडीचे प्रमुख भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक हर्षकुमार जी रेलन, स्वागत अध्यक्ष युवराज (सनी) चौधरी, कार्याध्यक्ष निखिल वाघ यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी उत्सव साजरी करण्यावर संस्थापक अध्यक्ष हिरामण आप्पा गवळी यांनी आपले विचार मांडले व आनंदाने व जल्लोषाने परंतु हिन्दु धर्म संस्कृती प्रमाणे उत्सव साजरी करण्याचे ठरवण्यात आले. या बैठकीला माजी महापौर चंद्रकांत सोनार, संघटनेचे ज्येष्ठ पदाधिकारी विजू पाच्छापूरकर, जोसेफ मलबारी, कुमार मराठे, सुनील भाऊ वाघ, संजय जैन, छोटु चधरी, बबन चौधरी, भरत वाघ, गोटू सगरे खोंडे नाना, आबा ठोसर, मनोज शिरोडे, संजय वराडे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. सदर बैठकीत उपाध्यक्ष तुषार भागवत, पिंटू सैद, बबलू चौधरी, राजेश शहा, सचिव पवन जाजू, सहसचिव रमेश करणकाळ, खजिनदार आकाश मराठे, सहखजिनदार सागर लाड. सजावट प्रमुख सचिन देवरे, सदाशिव पेंटर सह सजावट प्रमुख हेमंत सूर्यवंशी प्रसिद्धी प्रमुख मयूर गवळी, हर्षल थोरात यांची निवड करण्यात आली. सदर बैठकीस संघटनेचे सर्व सभासद व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ह.भ.प.इंदोरीकर महाराजांचा मंगळवारी उडाणे येथे जाहिर किर्तनाचा कार्यक्रम

### आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

धुळे । प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन उडाणे ता.धुळे येथे राष्ट्रीय किर्तनकार व समाजप्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या जाहिर किर्तनाच्या कार्यक्रमाचे दि.१९ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने जिल्हयात विविध सामाजिक उपक्रम तसेच प्रबोधन,जागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने धुळे तालुक्यातील उडाणे येथे समाजप्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर किर्तन हे मंगळवार दि.१९ सप्टें.२०२३ रोजी सायं.५ वाजता उडाणे येथे होणार आहे. यावेळी जिल्ह्यातील वारकरी संप्रदायातील वारकरी व भजनी मंडळी उपस्थित राहणार आहे. तरी भाविकांनी किर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक सामाजिक कार्यकर्ते श्री धर्मराज बागुल तसेच माजी पं.स.सभापती भगवान गर्दे, कृषीभूषण भिका पाटील,उडाणे येथील माजी संचालक सोमनाथ बागुल, ज्येष्ठ नेते पोपट शिंदे,माजी उपसरपंच विठ्ठल बागुल,राजु मोरे, आधार हाके,सुभाष शिंदे,गमन शिंदे, ज्ञानेश्वर वाघ,संचालक नाना शिंदे आर्वी,चिंचवार माजी सरपंच सोमनाथ पाटील, सडगाव माजी सरपंच दादाजी पदमोर, युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश गर्दे, गोताणे माजी सरपंच भगवान पाटील, झुलाल पाटील, सरपंच भूषण पाटील, चुडामण पाटील, बल्हाणे सरपंच आनंदा बागले,एकनाथ वाघ निकुंभे यांच्यासह ग्रामस्थ उडाणे,भजनी मंडळ उडाणे ता.जि.धुळे व पंचक्रोशीतील भजनी मंडळ यांनी केले आहे.

### पालेशा महाविद्यालयात युवती सभेची स्थापना

धुळे । शहरातील मा. ध. पालेशा महाविद्यालयात युवती सभेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्त्या रेणुका बेलपाठक यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रभाकर महाले होते. प्राचार्य डॉ. प्रभाकर महाले म्हणाले की, विविध क्षेत्रात महिला यशस्वी होण्याचे प्रमाण अधिक आहे. भविष्यात महिलांना उच्च शिखर गाठण्याच्या भरपूर संधी आहे. या संधीचे त्यांनी सोने करावे असेही ते म्हणाले. उपप्राचार्य बी. एस. काळे उपस्थित होते.

# नाशिक भाजपातर्फे श्री संतसेना महाराजांना अभिवादन

नाशिक । प्रतिनिधी



श्री संतसेना महाराज पुण्यतिथी निमित्त भाजपा वसंतस्मृती कार्यालयात भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री संतसेना महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी काशिनाथ शिलेदार, अरूण शेंदुर्णीकर, राजेंद्र कोरडे, संतोष नेरे, रोशन शिंदे, आनंत सोनवणे, दिलीप जाधव, राजु मोरे, गौरव पगारे, प्रेम भदाणे, अविनाश शिंदे, मंगेश कोटे, राजेश शिंदे, सुजाता करजगीकर, अशोक चव्हाण, सुरेश कोरडे, राकेश पाटील, शैलेंद्र जुन्नरे आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानतर्फे शवपेट्यांचे वाटप

### नावरी, वार, भोकर, वणी, सांजोरी आदी होणार गावांना लाभ

धुळे । प्रतिनिधी



बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानतर्फे, धुळे तालुक्यातील गावांना शवपेटींचे वाटप करण्यात आले. नावरी, वार, भोकर, वणी, सांजोरी आदी गावांना या शवपेटीचा लाभ होणार आहे. यावेळी त्या-त्या गावातील पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. गावातील मृतदेहांची हेळसांड टाळली जाणार असल्याने ग्रामस्थानी समाधान व्यक्त केले जात आहे. यापूर्वी धाडरे-धाडरी, सडगाव आदी गावांनाही शवपेटी देण्यात आली आहे.

एखादी व्यक्ती मयत झाल्यानंतर, बर्याचदा नातेवाईकांची प्रतिक्षा करत मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याचे थांबवावे लागते. कुटुंबातील एखादी व्यक्ती वा आप्तेष्ट बाहेरगावाहून येण्यास वेळ लागत असेल तर मृतदेहाची हेळसांड करण्याची शक्यता नाकारता येत नाही. या गोष्टीची दखल घेत इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे व सचिव शालिनी भदाणे यांनी तालुक्यातील काही गावांना शवपेटीची मदत केली. प्रतिष्ठानतर्फे नावरी, वार, भोकर, वणी, सांजोरी आदी गावांना शवपेटीचे वाटप करण्यात आले. यावेळी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे, धुळे मनपाचे नगरसेवक गोपीचंद पाटील, रंगराव पाटील, सामाजिक कार्यकर्ते बारकू पाटील, सचिन पाटील, किशोर देवरे (भोकर), युवराज मराठे अनिल पाटील, दिलीप पाटील, धनराज गायकवाड, हिलाल वाघ, अशोक पाटील, अनिल मोरे, सुभाष शिंदे, विलास सोनवणे, मोतीलाल कोळी (वार), प्रकाश पाटील, आसाराम पाटील, योगेश शिरसाठ, विलास पाटील, संजय पाटील, शरद पाटील, दीपक पाटील (नावरी), दिलीप ठाकरे, सतीश जाधव, अशोक गवळी, जगन्नाथ माळी, देविदास माळी, जिजाबराव माळी, एकनाथ पाटील, गणेश घुगे, दिलीप पाटील, भरत महाजन (सांजोरी) बाळू पाटील, अमरनाथ पवार, संतोष पाटील रवी पाटील, विजय पाटील, रवींद्र पाटील, प्रकाश पाटील, सुनील कांकरिया (वणी बु.), पं.स.सदस्य सुभाष पाटील, बोरकुंड सरपंच हेमंत पाटील, नाणे सरपंच अजय राजपूत, गोंदूर माजी सरपंच राजू पाटील, जुन्नेरचे गणेश गवळी आदी उपस्थित होते. शवपेटी उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्या-त्या गावातील ग्रामस्थानी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानप्रती समाधान व्यक्त केले आहे.

# आज पीएम स्कील रन मॅरेथॉन स्पर्धेंचे आयोजन

धुळे । प्रतिनिधी

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,धुळे यांच्यावतीने धुळे शहरातील शासकीय, खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तसेच शासकीय तांत्रिक विद्यालयामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी पीएम स्कील रन मॅरेथॉन स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य रा.सु.मानकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

ही पीएम स्कील रन मॅरेथॉन स्पर्धा रविवार १७ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ७ वाजता औद्योगिक प्रशिक्षण संस्था,धुळे येथून सुरु करण्यात येईल. ही मॅरेथॉन स्पर्धा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धुळे- सावित्रीबाई फुले पुतळा- वीर सावकर पुतळा-अग्रवाल भवन- कमलाबाई हायस्कुल- शासकीय तांत्रिक विद्यालय,जिल्हा कारागृह,धुळे परत शासकीय तांत्रिक विद्यालय, कमलाबाई हायस्कुल- अग्रवाल भवन- वीर सावकर पुतळा- सावित्रीबाई फुले पुतळा मार्गे औद्योगिक प्रशिक्षण संस्था,धुळे या मार्गावरुन काढण्यात येईल. या मॅरेथॉन स्पर्धेत साधारणत: ७०० विद्यार्थी सहभागी होणार असल्याची माहिती धुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री.मानकर यांनी दिली आहे.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# गणेशोत्सव शांततामय आणि सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा करावा : जिल्हाधिकारी

## माझा गणपती माझी सचोटी उपक्रम : शांतता समितीच्या सदस्यांची बैठक संपन्न










धुळे।
जिल्ह्यात मंगळवार २९ सप्टेंबर २०२३ रोजी गणरायाचे आगमन होत आहे. जिल्हा प्रशासनातर्फे गणेशोत्सवात सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. गणेशमंडळ, नागरिकांनी गणेशोत्सव पर्यावरणपूरक, शांततामय आणि सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात शांतता समितीच्या सदस्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी श्री. गोयल बोलत होते. यावेळी महापौर प्रतिभा चौधरी, पोलिस अधीक्षक संजय बारकुंड, महानगरपालिकेचे आयुक्त अमिता दगडे-पाटील, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, अपर पोलीस अधिक्ष किशोर काळे, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी सांगितले, गणेशोत्सवासाठी जिल्हा प्रशासनातर्फे पोलिस दल, महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, वीज वितरण कंपनीच्या माध्यमातून आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील. उत्सवकाळात वीजपुरवठा सुरळीत राहील यासाठी  विद्युत विभागाने काळजी घ्यावी. तसेच महापालिकेने मोकाट गुराचा बंदोबस्त करावा. विर्सजनाच्या ठिकाणी स्वच्छता, निर्माल्य विर्सजन, लाईटची व्यवस्था, बॅरिकेट्स, रस्त्यावरील खड्ड्याची डागडूजी करावी, विसर्जन मिरवणुकीसाठी पुरेशी प्रकाशयोजना, विसर्जनस्थळी जीवरक्षकांच्या नियुक्तीच्या सूचना महानगरपालिकेला दिल्या आहेत. वीज वितरण कंपनीने वीज पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी. मिरवणुक तसेच विसर्जन दरम्यान अनावश्यक विद्युत तारा तसेच झाडांची फाद्यांची छाटणी करावी आदी बाबींचे नियोजन करावे. तसेच मंडळाचे पदाधिकारी, नागरिकांनीही शासनाच्या मार्गदर्शक सूचना, नियमांचे पालन करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्यात.

संकलन : दिपक वाघ



CMYK

दैनिक लक्ष महाराष्ट्र





# गणपती बाप्पाच्या वेगवेगळ्या मूर्ती बाजारात

## सिंहासनावर आरूढ.. कमळावर बसलेला.. बाल गणेश..अशा गणरायांच्या विविध रूपांनी अवघा रंग एकच झाल्याची अनुभूती















धुळे । आपल्या घरातील मूर्ती सगळ्यात सुंदर आणि आकर्षक असावी, अशी प्रत्येकाची इच्छा असते. गणेशोत्सव म्हटलं की, गणपतीच्या वेगवेगळ्या मूर्ती बघायला मिळतात.आपल्या घरातील मूर्ती सगळ्यात सुंदर आणि आकर्षक असावी त्यामुळे अनेक भाविक घरगुती गणपतीसाठी वेगवेगळे पर्याय आणि आकर्षक मूर्ती शोधत असतात. त्यात पर्यावरणपुरक मूर्ती, वेगवेगळ्या प्रकारचे फेटे घालून असलेले गणपती तर कधी इको फ्रेंडली गणपतीच्या शोधात असतात मात्र यंदा बालगणेश मूर्तीला चांगलीच पसंती मिळत आहे. यात आपल्या लाडक्या बाप्पांचं लहान रूप पाहायला मिळणं म्हणजे भाविंकांसाठी पर्वणीचं.. कुठे हसरा तर कुठे निवांत बसलेले बाप्पा सध्या बाजारात पाहायला मिळत आहेत. बाळगणेशाचं हे रूप पाहून कोणीही त्याची दखल घेतल्याशिवाय राहू शकत नाही. खेळणारे बाप्पा, पुस्तक वाचणारे बाप्पा त्यासोबतच लाडू खाणारे बाप्पा सर्वांचं लक्ष वेधून घेत आहेत. गणरायाच्या आगमनासाठी एकच दिवस बाकी असल्याने आपल्या लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठीच्या तयारीची लगबग आणखी वाढली आहे.गणरायाच्या सेवेत कोणतीही कमतरता राहू नये यासाठी गणेशभक्त जय्यत तयारी करत आहे. काही कारागिरींनी टीव्हीवरील कार्टून मालिकेतील पात्रांना आकार दिला आहे. मोटू पतलू, छोटो भीम ही पात्रे यंदा गणेशाचे रुप घेऊन येणार आहेत. कारागिरांनी बच्चे कंपनीची आवड लक्षात घेऊन मूर्ती घडविल्या आहेत. गणेशोत्सव अवघ्या तीन दिवसांवर आला असुन गणपती मूर्तींची कामे अंतिम टप्प्यात आली आहे.आपल्या लाडक्या बाप्पाच्या मूर्तींवर वेगवेगळ्या प्रकारचे रंग, चकाकणारी जरी लावणे तसेच मूर्तीवर खडे -हिरे लावण्यात तसेच नक्षी काढण्यात मुर्तीकार मग्न आहेत.

संकलन : दिपक वाघ